नियमित दिवाणी मुकदमा क्र. ७९/२०१६
(श्री. भालचंद्र पाडगांवकर विरुघ्द शंकर पाडगांवकर )

**:– नि. ६७ खालील आदेश –:**

१. अर्ज व म्हणणे वाचून पाहिले. वादी तर्फे वारस श्रीराम भालचंद्र पाडगांवकर यांनी सदरचा अर्ज वादी भालचंद्र शंकर पांडगांवकर हे दिनांक २८/१२/२०२२ रोजी मयत झालेले असून त्यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. अर्जदार यांचे अर्जातील कथन असे की, या कामातील अर्जदार हा नात्याने वादीचा मुलगा आहे. आणि तोच या कामात वादीचा अखत्यारी होता. त्यामुळे अखत्यारी या नात्याने तोच सदर दाव्याचे कामकाज पाहत होता. वादी मयत झाल्यानंतर मयत वादीचे वारस दाखल करण्याची कल्पना नव्हती. सबब सदरची माहीती अर्जदारने आपल्या वकीलांना दिली नाही. सबब त्यामुळे वादी यांचे वारस मुदतीत अभिलेखावर दाखल करता आले नाहीत. वादीचे वारस दाखल करण्यास वादींना सुमारे ०४ महीने २३ दिवसांचा विलंब झालेला आहे. तसेच वादीचे वारस दाखल करुन न घेतल्यास अर्जदार यांचेवर मोठा अन्याय होणारा आहे. अर्जदार यांस सदर वाटपाचा दावा पुढे चालवावयाचा आहे.

तरी न्यायपुर्ततेसाठी वारस दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवून अर्ज मंजुर करण्यात यावा अशी विनंती अर्जदार तर्फे करण्यात आली आहे.

३. प्रतिवादी यांनी सदर अर्जावरच आपले म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत घेतली आहे. प्रतिवादींचे म्हणणे असे की, अर्जातील कारणे संयुक्तीक नाहीत. अर्ज मंजूर करण्याच्या विचाराधीन मे. न्यायालय आल्यास रक्कम रु.५००/– खर्च आकारुन अर्ज मंजूर करणेस हरकत घेतली.

४. मुदतीचा कायदा आर्टीकल १२० नुसार दाव्यातील एखादा पक्षकार मयत झाल्यास मृत्युच्या तारखेपासून ९० दिवसांच्या आत मयत पक्षकाराच्या कायदेशीर प्रतिनिधींना दाव्यामध्ये समाविष्ट करुन घेणे आवश्यक असते. त्याचबरोबर अशा मयत पक्षकाराबाबत दावा उपशमित झाल्यास आर्टीकल १२१ नुसार ६० दिवसांच्या आत तो आदेश रद्द करुन घेणे आवश्यक आहे.

५. प्रस्तुत दाव्यातील वादी भालचंद्र शंकर पांडगांवकर हे दिनांक २८/१२/२०२२ रोजी मयत झालेले आहेत. त्यामुळे मृत्यू तारखेपासून पुढे ९० दिवसांचे आत त्यांचे वारसाबाबत दाव्यामध्ये तजवीज करणे आवश्यक होते. परंतु वारस दाखल करण्यास त्यांना विलंब झालेला आहे. प्रस्तुतचा दावा, सरस निरस धडेवाटपाकरीता दाखल केला आहे. त्यामुळे परिणामकारक हुकूमनामा

काढण्यासाठी वादी चे वारस दाव्यामध्ये सामील करणे आवश्यक आहे. सबब सदरचा विलंब माफ करणेकरीता ६७ कडील अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. परंतु वादी चे वारसास रेकॉर्डवर आणण्यास झालेल्या विलंबामुळे प्रतिवादी व न्यायालयाचा वेळ खर्ची झाल्याने अर्जदार यांचेवर योग्य तो खर्च लावणे आवश्यक आहे. करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. नि. ६७ कडील अर्ज अर्जदार यांनी प्रतिवादीला रक्कम रुपये १००/- (रुपये शंभर ) इतका खर्च देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येत आहे.

२. अजदार यांनी खर्चाची रक्कम दिल्यानंतर मयत वादी यांचे कायदेशीर प्रतिनिधी दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येत आहे.

३. येणेप्रमाणे अर्ज निकाली करण्यात येत आहे.

सही/-
दिनांक- १४/१२/२०२३ (प.रा.ढोरे )
सह.दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
कुडाळ.